अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: साप्रवि /आस्था/प्र.३/2६३e
दिनांक:- 20/0६/202४

## आज्ञापत्र

विषय:- श्री. संदेश बाळासाहेब कुळवमोडे -कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), यांचा पुणे महानगरपालिका सेवेतील राजीनाम्याबाबत.

संदर्भ:- १)श्री. संदेश बाळासाहेब कुळवमोडे यांचा दि. ०७/०६/२०२४ रोजीचा अर्ज.
२)अधिकार सुपूर्ती आज्ञापत्र जा. क्र.मआ/उआ/से/१८०५, दि. ०५/१०/२००९
३) मा.अति.महापालिका आयुक्त ठ.क्र. ९/८८ ,दि.20/0६/२०२४.

पुणे महानगरपालिका **बांधकाम** विभागाकडील श्री संदेश बाळासाहेब कुळवमोडे, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-३ यांनी दि. २०/०६/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेबाबत संदर्भ क्र.१ अन्वये विनंती अर्ज सादर केला आहे.

श्री. संदेश बाळासाहेब कुळवमोडे, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी केलेली विनंती व मा. शहर अभियंता,पुणे महानगरपालिका यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन संदर्भ क्र. २ चे अधिकार सुपूर्ती आज्ञापत्रान्वये प्राप्त अधिकारात दि. २०/०६/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर महानगरपालिका सेवेचा श्री. संदेश बाळासाहेब कुळवमोडे यांचा राजीनामा स्विकृत करून त्यांना महानगरपालिका सेवेतून सेवामुक्त करणेस संदर्भ क्र.३ च्या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार, श्री. संदेश बाळासाहेब कुळवमोडे, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग–३ यांना दि.२०/०६/२०२४ कार्यालयीन वेळेनंतर पुणे महानगरपालिका सेवेतून सेवामुक्त करण्यात येत आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी सदर आदेशाची त्यांचे सेवापुस्तकात नोंद करावी आज्ञापत्र जा.क्र. मआ /उआ(साप्र)/आस्था/२५३१,दि. २८/१२/२०१७. अट क्र. १३ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करणेत यावी.

तसेच त्यांचेकडून पुणे महानगरपालिकेचे काही येणे बाकी असल्यास ते वसूल करण्याची तसेच पुणे महानगरपालिकेने पुरविलेले सिमकार्ड,लॅपटॉप इत्यादी कोणतेही साहित्य पुरविले असल्यास जमा करून घेणेची तजवीज शहर अभियंता कार्यालयाने करावी.

Raut
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
20/6/2024

प्रत:-१) शहर अभियंता, पुणे महानगरपालिका,
पुणे महानगरपालिका
यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित...

२) श्री. संदेश बाळासाहेब कुळवमोडे-कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)
यांना मा.खातेप्रमुख यांचे कार्यालयामार्फत...